# दिनो मारिओसोबत 'सेल्फी'चा आनंद

## शिरपूरच्या भेटीत मनसोक्त रमला विद्यार्थ्यांमध्ये

**सकाळ वृत्तसेवा**



**शिरपूर : पटेल फार्मसी महाविद्यालयात गुरुवारी अभिनेता दिनो मारिओ यांच्यासमवेत सेल्फी घेण्यात दंग विद्यार्थिनी.**

शिरपूर, ता. ३१ : हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेता दिनो मारिओ यांच्यासोबत 'सेल्फी' काढण्याचा मनसोक्त आनंद येथील पटेल फार्मसी महाविद्यालयाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी लुटला. कुठलेही आढेवेढे न घेता दिनो मारिओ विद्यार्थ्यांच्या सहवासात रंगून गेले होते.

येथील नगरसेवक तथा शिरपूर टेक्स्टाईल पार्कचे अध्यक्ष तपन पटेल यांचे घनिष्ठ मित्र असलेले दिनो मारिओ व प्रणव प्रेमनारायण यांनी आज शिरपूरला भेट दिली. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उद्यान, मुकेशभाई पटेल रिक्रिएशन गार्डन, आर. सी. पटेल फार्मसी महाविद्यालय, आर. सी. पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय आदींची त्यांनी पाहणी केली. नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, तपन पटेल यांच्याकडून येथील विकासकामांची माहिती त्यांनी घेतली. ग्रामीण भागातील शहरात उपलब्ध सोयीसुविधा पाहून प्रभावित झाल्याचे त्यांनी सांगितले.

संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव प्रभाकर चव्हाण, प्राचार्य डॉ. जे. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. प्रमोद देवरे, वित्त अधिकारी नाटूसिंह गिरासे, कुलसचिव प्रशांत महाजन, धीरज देशमुख आदी उपस्थित होते.